# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वर्धा **P.S.(ठाणे):** कारंजा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0023 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/01/2026 23:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 14/01/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/01/2026
**Time From (वेळेपासून):** 13:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:23 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 14/01/2026 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 019
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/01/2026 23:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 32 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी साजा मौजा काजळी,कारंजा घा, 442001

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शा. तर्फे कान्होपात्रा बन्सा पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ACB Wardha,Wardha,वर्धा,वर्धा,महाराष्ट्र,442001,भारत |
| 2 | स्थायी पता | ACB Wardha,Wardha,वर्धा,वर्धा,महाराष्ट्र,442001,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9922995975

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ललीतकुमार रामकृष्णाजी जोगे पद - तलाठी | | | 1. साजा क्र 21 काजळी,कारंजा घा,कारंजा ,वर्धा,महाराष्ट्र,भारत-442001<br>2. सुखकर्ता नगर, आलोडी,वर्धा, सेवाग्राम,वर्धा,महाराष्ट्र,भारत-442001 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फिर्याद देताच

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | Redmi Note 9 | 9,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | Sandisk कंपनीचे 32GB चे 2 Memory Card | 0.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 Rs. च्या 6 चलनी नोटा 3000Rs. | 3,000.00 |
| 4 | इतर | घरगुती वस्तु | फिक्कट निळया रंगाचा जिन्स पॅन्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

12,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

नक्कल फिर्याद -
ला.प्र.वि. जि. वर्धा.
कॅम्प पो.स्टे.कारंजा (घा),जि.वर्धा
दिनांक: 14/01/2026

मी कान्होपात्रा बन्सा, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा दिनांक 14/01/2026 रोजी सकाळी 10.15 वाजता आम्ही कार्यालयात हजर असताना, दोन व्यक्ती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, वर्धा येथे आले व पोलीस उपअधीक्षक साहेब यांच्या कक्षात गेले. त्यानंतर काही वेळाने पोलीस उपअधीक्षक श्री राकेष साखरकर साहेबांनी मला आवाज देवुन त्यांचे कक्षात बोलाविले व त्यांनी त्यांचे कक्षात बसुन असलेल्या दोन व्यक्तींचा परिचय करून दिला त्यावेळी त्यातील एका व्यक्तीने त्यंाचे नाव श्री रामकृशण राघोबाजी परतेती, वय 65 वर्श, व्यवसाय-षेती, रा. राहाटी, ता. कारंजा (घा.), जि. वर्धा असे सांगीतले व माझी एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही त्यांच्या सोबत हजर असलेले व्यक्ती कोण आहेत? असे विचारले असता, त्यांनी ते त्यांचे मित्र असुन त्यंाचे नाव गजानन नामदेवराव टोपले, रा. काजळी, ता. कारंजा (घा.), जि. वर्धा असे असल्याचे सांगीतले. आम्ही दि. 14/01/2026 रोजी सकाळी 10.35 वा. ला.प्र.वि. कार्यालयातील कर्मचाÚयांच्या हस्ते षासकीय पंचाना बोलाविले व तक्रारदार यांची दोन्ही षासकीय पंचाना ओळख करून दिली व तक्रारदार यांना एक कोरा कागद व पेन उपलब्ध करून देवुन तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार लिहुन आमचे समक्ष सादर केली असुन सदरची लेखी तक्रार खालीलप्रमाणे आहे.

लेखी तक्रार
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा
दिनांक: 14/01/2026
प्रति,
मा. पोलीस उपअधीक्षक साहेब,
ला.प्र.वि.वर्धा

अर्जदार:- श्री रामकृशण राघोबाजी परतेती, वय 65 वर्श, व्यवसाय-षेती, रा. राहाटी, ता. कारंजा (घा), जि. वर्धा

विशय:- एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याबाबत.

महोदय,

मी अर्जदार रामकृश्ण परतेती उपरोक्त विशयानुसार माझे मित्र गजानन नामदेवराव टोपले, रा. काजळी यांचेसह त्यं ाची मोटर सायकल क्र. एमएच-31-एफके-6475 ने आज दि. 14/01/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय वर्धा येथे येवुन लेखी तक्रार देत आहे की, माझे मौजा डोंगरगाव षेत षिवारात षेत सर्वे क्र. 59/1 नुसार 2 हे. 49 आर षेत आहे. त्या षेताचे सातबाÚयावर सन 2022-23 व 2023-24 चे पेरेपत्रक चढवण्यासाठी मी दि. 22/12/2025 रोजी आमचे काजळी गावातील तलाठी साजा कार्यालयात माझे मित्र गजानन टोपले यांच्यासोबत तलाठी श्री जोगे साहेब यांच्याकडे गेलो होतो. तेव्हा माझे मित्र गजानन टोपले यांच्या समक्ष जोगे साहेब यांनी सदर कामासाठी माझ्याकडुन 1,600/- रूपये घेतले होते व सातबाÚयावर त्यांचे हस्ताक्षरात पिकपेरा चढवुन त्यांनी त्यांची सही केली होती.

त्यानंतर दि. 07/01/2026 रोजी मी व माझा मित्र गजानन टोपले असे तलाठी जोगे साहेबांना तलाठी कार्यालय, काजळी येथे जावुन भेटलो व त्यांना सन 2024-25 चा पिकपेरा सातबाÚयावर चढवुन देण्याची विनंती केली असता, त्यांनी मागच्या व आताच्या अषा दोन्ही पिकपेरा चढवुन कामाचे एकुण 3,000/- रूपये दयावे लागतील, असे म्हटल्याने त्यावेळी माझेजवळ जोगे साहेबांना देण्यासाठी 3,000/- रूपये नसल्याने व मला लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी व माझा मित्र गजानन टोपले असे परत आलो.

मला तलाठी जोगे साहेब यांना लाच म्हणुन 3,000/- रूपये देण्याची मुळीच इच्छा नसल्याने व मला षेतीचे काम असल्याने मी आज रोजी माझे मित्र गजानन टोपले यांचेसोबत ला.प्र.वि. कार्यालय, वर्धा येथे हजर येवुन व माझ्या बचतीतील 3000/- रूपये रोख आपल्याकडे जमा करीत असुन तक्रारीसोबत डिसेंबर 2025 मध्ये जोगे साहेबांनी सातबाÚयावर चढवलेल्या पिकपेÚयाचे सातबारा उतारा प्रत सोबत देत आहे.

तलाठी जोगे साहेब यांच्याषी माझे जुने वैमनस्य नाही किंवा कोणता वाद नाही. तलाठी जोगे साहेब यांच्यावर कार्यवाही होणेस माझी लेखी तक्रार देत आहे. सही इंग्रजीत अस्पश्ट. रामकृश्ण राघोबाजी परतेती दि. 14/01/2026 अषी तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार दिली. सदरची तक्रार आम्ही वाचुन दोन्ही पंचाना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी सदरची तक्रार वाचुन तक्रारदार यांचे तक्रारीवर व तक्रारदार यांनी सादर केलेले कागदपत्रांवर स्वाक्षरी केली. तसेच आम्ही सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यानंतर आम्ही आज दि. 14/01/2026 रोजी तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार श्री जोगे, तलाठी यांची लाचमागणीबाबत पडताळणी करणे असल्याने श्री राकेष साखरकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. वर्धा यांचे प्रत्यक्ष मार्गदर्षनात आम्ही, पो.नि. संदीप मुपडे, दोन्ही षासकीय पंच व सापळा पथक असे षासकीय वाहन क्र. एमएच-32-एएस-4047 व एमएच-32-जे-0236 ने चालक स.फौ. गणेष मसराम यांचेसह 11.30 वा. कार्यालयातुन रवाना झालो व तक्रारदार हे त्याचे मित्र गजानन टोपले यांचे सह त्यांचे मो.सा.ने आमचे वाहणाचे समोर रवाना झाले व तक्रारदार व त्यांचे मित्र काजळी षिवारातील बांगडापुर ते कां ढाळी रोडवरील नामदेव भादे रा.खैरी यांचे षेताजवळ येवुन थांबले असता आम्ही सुध्दा वेळ 12.55 वा. तक्रारदार थांबुन असलेल्या ठिकाणी पोहचलो. यानंतर आम्ही, तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार श्री जोगे तलाठी, साजा काजळी यांचे लाच मागणी बाबत पडताळणी करणे असल्याने तक्रारदार व दोन्ही पंच यांना व्हॉईस रेकार्डर व अ ॅन्थ्रासिन पावडर यांचे गुणधर्मविशयी माहिती देवुन प्रात्यक्षीक करुन दाखवीले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गैरअर्जदार श्री जोगे यांची कोठे भेट होईल? याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी गैरअर्जदार जोगे हे त्यांचे तलाठी कार्यालय साजा काजळी येथे भेटतील असे सांगीतले. त्यावरून आम्ही तक्रारदार, तक्रारदाराचे मित्र नामे गजानन टोपले व पंच क्र. 01 यांना तक्रारदार यांचा मित्र गजानन टोपले यांच्या जवळील स्प्लेन्डर प्लस गाडी क्र. एमएच-31-एफके-6475 ने गै.अ. यांचे भेटीस रवाना करण्याचा निर्णय घेवुन तक्रारदार यांना गै.अ. यांनी खरच लाच मागणी केली किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन आम्ही टॅप बॅगमधील 32 जीबी क्षमतेचे सॅनडीस्क कंपनीचे मेमरी कार्ड बाहेर काढले असता, त्याचा सिरीयल क्रमांक 5172XV3018MJ असा आहे. सदरचे मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन मेमरी कार्डमध्ये कोणत्याही प्रकारची रेकॉर्डींग फाईल नसल्याची पंच व तक्रारदार यांची खात्री करून वेळ 13.24 वा. व्हॉईस रेकार्डर पंच क्र. 01 यांच्या आवाजात सुरू करून तक्रारदार यांना योग्य सुचना देवुन स्प्लेन्डर प्लस गाडी क्र. एमएच-31-एफके-6475 ने रवाना केले. त्यांनतर तक्रारदार हे थोडयावेळाने मोटर सायकलने आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकार्डर पंच क्र. 01 यांच्या आवाजात वेळ 13.37 वा. बंद केली असता, व्हॉईस रेकार्डरचे स्क्रिनवर फाईल क्र. 260114_1324 असा

तयार झाल्याचे दिसले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना विचारणा केली असता, पंच क्र. 01 यांनी सांगीतले की, मी.तक्रारदार व तक्रारदार यांचा मित्र गजानन टोपले असे काजळी येथील तलाठी साजा येथे गेलो असता, गैरअर्जदार हे त्यांचे कार्यालयात हजर होते. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे कामासंबंधी गै.अ. यांच्याषी बोलणी केली असता, गै.अ. यांनी त्यांना पंचवीसचे व आताचे असे दोन्ही चे 3 करुन टाका असे म्हणुन हाताचे बोटाचे ईषा-याने 3 बोटांचा ईषारा केला त्यावरून तक्रारदार व तक्रारदारासोबतचे त्यांचे मित्र गजानन टोपले यांनी गैरअर्जदार यांना तीन हजार रुपये का असे विचारल्यानंतर गैरअर्जदार यांनी हो म्हणत तक्रारदारचे सातबायावर पिकपेरा चढविण्याकरीता 3,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी केली. तक्रारदार यानी ठिक आहे. मी थोडया वेळानी पैसे आणुन देतो म्हणुन तलाठी कार्यालयातुन निघुन सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवुन संपूर्ण हकीकत पंच क्र. 01 यांनी आम्हास पंच क्र. 02 यांच्या समक्ष सांगीतली. त्यानंतर आम्ही सदरची व्हॉईस रेकॉर्डीग दोन्ही पंचाचे समक्ष ऐकली असता, गै. अ. श्री जोगे, तलाठी साजा काजळी यांनी तक्रारदार यांना त्यांचे मागील व आत्ताचे 2024-2025 चे सातबायावर पिकपेरा चढविण्याचे षासकीय कामाकरीता 3,000/- रूपयाची लाच रक्कम स्पश्ट मागीतल्याचे आढळुन आले व पंच क्र. 01 यांनी सत्य परिस्थिती कथन केल्याचे दिसले. व्हॉईस रेकार्डर मधील संभाशणाची सविस्तर स्क्रिप्ट तयार करून पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी 3,000/- रूपयाची लाच रक्कमेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी तक्रारीवेळी आमचे समक्ष हजर केलेले 3,000/- रूपये दराच्या 06 नोटा एकुण 3,000/- रूपये आम्ही पंच क्र. 01 यांना सदर नोटांचे क्रमांक वाचण्यास सांगुन पंच क्र. 02 यांनी एका कागदावर सदर नोटांचे क्रमांक नमुद केले व दोन्ही पंच व आम्ही त्यावर सही केली.

त्यानंतर तक्रारदार यांनी आमचेकडे तक्रारीवेळी सादर केलेली लाच रक्कम म्हणुन दिलेलया 500/- रूपये दराच्या 06 नोटांना सापळा पार्टीतील सदस्य पो.षि. लक्ष्मण केन्द्रे यांच्या हस्ते पो.नि. संदीप मुपडे यांचे सही व लेबल असलेल्या सिलबंद अॅन्थ्रासिनचे बाटलीचे सिल काढुन पो.षि. लक्ष्मण केन्द्रे यांच्या हस्ते दोन्ही पंचाचे समक्ष तक्रारदार यांना अॅन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माविशयी माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले व वरील 500/- रूपये दराच्या 06 नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन सदर नोटा एका कोया लिफाफ्यामध्ये ठेवुन सदरचा लिफाफा तात्पुरता पो.षि. लक्ष्मण केंद्रे यांचे ताब्यात ठेवला.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी मागणी प्रमाणे अॅन्थ्रासिन पावडर लावुन असलेली लाच रक्कम 3,000/- रूपये ज्यात 500/- रूपये दराच्या 06 चलनी नोटा पो.षि. लक्ष्मण केंद्रे यांना लिफाफ्यामधुन बाहेर काढुन तक्रारदार यांचे षर्टाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषात ठेवुन देण्याच्या सुचना दिल्याने पो.षि. लक्ष्मण केंद्रे यांनी तक्रारदार यांच्या षर्टाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषात अलगद ठेवुन दिल्या व आम्ही तक्रारदार यांना गै. अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तलाठी कार्यालयाचे बाहेर येवुन रूमालाने तोंड पुसण्याच्या सुचना दिल्या त्यानंतर आम्ही टॅप बॅगमधुन 32 जीबी क्षमतेचे सॅनडीस्क कंपनीचे मेमरी कार्ड बाहेर काढले असता, त्याचा सिरीयल क्रमांक 5172XV3018M5 असा आहे. सदरचे मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन मेमरी कार्डमध्ये कोणत्याही प्रकारची रेकॉर्डीग फाईल नसल्याची पंच व तक्रारदार यांची खात्री करून व्हॉईस रेकॉर्डर वेळ 14.10 वा. पंच क्र. 01 यांचे आवाजात सुरू करून पंच क्र. 01 यांचेसह तक्रारदार यांना तक्रारदार यांचे मित्र गजानन टोपले यांची स्प्लेन्डर प्लस गाडी क्र. एमएच-31-एफके-6475 ने रवाना करण्यात आले. त्यांचे मागोमाग आम्ही तसेच पोलीस उपअधीक्षक, श्री राकेष साखरकर, पो.नि. श्री संदीप मुपडे, पंच क्र. 02 व सापळा पथक असे षासकीय वाहनाने रवाना झालो. तक्रारदार यांनी त्यांचे वाहन काजळी येथे तलाठी साजा कार्यालयाचे समोर उभे केले व तक्रारदार व पंच क्र. 01 असे गै.अ. यांचे कार्यालयात गेले. आम्ही सुध्दा कार्यालयाचे जवळजवळ कोणालाही संषय येणार नाही, अषा प्रकारे आजुबाजुला तक्रारदार यांच्या नियोजीत ईषा याची वाट पाहत थांबुन राहलो. त्यानंतर तक्रारदार यांनी वेळ 14.21 वा. तक्रारदार यांनी त्यांचे पॅटचे डावे खिषातील रूमाल डावे हाताने बाहेर काढुन त्याने तोंड पुसुन नियोजित ईषारा दिल्याने आम्ही, तसेच पंच क्र. 02 व सापळा पार्टीतील सदस्य असे गै.अ. यांचे तलाठी साजा कार्यालयात जावुन गै.अ. यांना आमचे ओळखपत्र दाखवुन त्यांना आमचा परिचय देवुन सर्वासमक्ष पंच क्र. 01 यांना विचारणा केली की, लाच रक्कम कोणी घेतली? व कोठे ठेवली? तेव्हा पंच क्र. 01 यांनी गै.अ. यांच्याकडे बोट दाखवुन लाच रक्कम यांनी स्विकारून त्यांनी त्यांचे जिंस पॅन्टचे मागील बाजुच्या डाव्या खिषात ठेवले आहे. असे सांगीतल्याने आम्ही गैरअर्जदार जोगे, तलाठी यांना स्टापचे मदतीने ताब्यात घेवुन पंच क्र. 01 यांना दिलेल्या सुचनेवरून व्हॉईस रेकॉर्डर वेळ 14.23 वा. बंद करण्यात आले. त्यावेळी व्हॉईस रेकॉर्डरचे स्क्रिनवर फाईल क्र. 260114_1410 तयार झाल्याचे आम्हाला दिसले. त्यानंतर आम्ही गैरअर्जदार यास त्यांचे नाव, पद व पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांचे नाव ललीतकुमार रामकृश्णाजी जोगे, वय 40 वर्श, पद-तलाठी (साजा क्र. 21 काजळी, ता. कारंजा जि, वर्धा), रा. सुखकर्ता नगर, आलोडी, ता. जि. वर्धा असे सांगीतले. त्यानंतर आम्ही पंच क्र.

02 यांना दिलेल्या सुचनेवरून पंच क्र. 02 यांनी गै.अ. यांची अंगझडती घेतली. गै.अ. यांच्या अंगझडतीमध्ये गै.अ. यांनी परिधान केलेल्या जिंस पॅन्टचे मागील बाजुच्या डाव्या खिषाच्या आत 500/- रूपये दराच्या 06 चलनी नोटा अषी एकुण 3000/- रूपये लाच रक्कम मिळुन आल्याने सदरची लाच रक्कम सापळा कार्यवाहीमध्ये वापरण्यात आलेली तिच आहे का? याबाबत सदर नोटांचे क्रमांक पंच क्र. 02 यांनी सापळा कार्यवाही अगोदर एका कोया कागदावर लिहुन ठेवलेल्या नोटांचे क्रमांक व गै.अ. यांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेल्या नोटांचे क्रमांकाची पंचासमक्ष पडताळणी केली असता, सापळा कार्यवाहीत वापरण्यात आलेली लाच रक्कम ही तीच असल्याने पंच क्र. 02 यांच्या ताब्यात तात्पुरती ठेवुन देण्यात आली.

त्यानंतर आम्ही सापळा पार्टीतील सदस्यांचे मदतीने काळया रंगाचे कापडाचे आवरण धरून साधारण आंधार केला व अल्ट्राव्हॅ◌ायलेट लॅम्प सुरु करून त्याचा प्रकाष आळीपाळीने आमचे, पंच क्र 1 व सापळा पार्टीतील पो.हे.कॉ. पंकज डाहाके, मंगेष झांबरे, म.पो.हे.कॉ. राखी फुलमाळी, पो.कॉ. मनिश मसराम, प्रषांत मानमोडे यांचे हाताचे पंजावर एक-एक करुन दोन्ही बाजुने तसेच कपडयांवर पाडला असता कोणतीही चकाकी दिसुन आली नाही. हि बाब आम्ही गै.अ. श्री. जोगे यांचे निदर्षनास आणुन दिली.

यानंतर स्टॅफचे मदतीने काळया रंगाचे कापडाचे आवरण धरून आम्ही वरनमुद नोटांवर अ◌ॅल्ट्राव्हॅ◌ायलेट लॅम्पचा प्रकाष एक एक करुन सर्व नोटांचे दोन्ही बाजूंवर टाकला असता नोटांवर अ◌ॅथ्रॅासिन पावडरची रेघ असलेल्या ठिकाणी निळसर पांढÚया रंगाची चकाकी दिसुन आली. यानंतर सदर लाच रकमेच्या नोटा आम्ही पंच क्र. 2 यांचे ताब्यात ठेवल्या.

त्यानंतर आम्ही गै.अ. यांचे हातावर काळा कापडाचे आवरण सापळा पार्टीचे मदतीने पकडुन अल्ट्रा व्हायलेट लॅम्पचा प्रकाष पाडला असता, गैरअर्जदार जोगे यांचे उजव्या हाताचे बोटावर निळसर पांढÚया रंगाचे चकाकी दिसुन आल्याने पंच क्र. 01 व तक्रारदार यांनी खात्री केली. तसेच गैरअर्जदार यांनी लाच रक्कम तक्रारदार यांच्याकडुन स्विकारून त्यांनी घटनेवेळी परिधान केलेल्या निळसर रंगाच्या जिंस पॅन्टच्या मागील बाजुच्या डाव्या खिषात ठेवल्याने अल्ट्रा व्हॅायलेट लॅम्पचा प्रकाष खिषाच्या आतील भागावर सापळा पार्टीच्या मदतीने प्रकाष पाडला असता, खिषाच्या आत निळसर पांढÚया रंगाची चकाकी दिसुन आली.

तसेच गै.अ. यांची पंच क्र. 02 यांनी आम्ही पुर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे सापळया नंतरची अंगझडती घेतली असता, गै.अ. यांचे जिंस पॅन्टचे समोरील खिषातील आकाषी रंगाचा थोडा कव्हर निघालेला आत पांढÚया रंगाचा जुना वापरता रेडमी कंपनीचा रेडमी नोट-9 मोबाईल फोन अंदाजे कि. 9,000/- रूपये ज्यात एअरटेल कंपनिचे सिमकार्ड ज्याचा मो.क्रमांक 9860484584 असा असलेला तसेच लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही करीता वापरण्यात आलेले एकुण 02 मेमरी कार्ड तसेच गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांनी परीधान केलेले निळया रंगाचा जिन्स पॅंटचे मागील डाव्या खिशात ठेवल्याने अ◌ॅन्थ्रासिन पावडरच्या संपर्कात आल्याने सदरचा जिन्स पॅंट तपास कामी जप्त करण्यात आला व लाच रक्कम 3,000/- रूपये असे सदर गुन्हयात सविस्तर जप्तीपत्रक तयार करून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले आहे.

तरी आरोपी लोकसेवक श्री ललीतकुमार रामकृश्णाजी जोगे, वय 40 वर्श, पद-तलाठी, (साजा क्र. 21 काजळी, ता. कारंजा(घा.), जि. वर्धा), विभाग-महसुल, वर्ग-3, रा. सुखकर्ता नगर, आलोडी, ता. जि. वर्धा यांनी तक्रारदार श्री रामकृश्ण राघोबाजी परतेती, वय 65 वर्श, व्यवसाय-षेती, रा. राहाटी, ता. कारंजा (घा.), जि. वर्धा यांना सन 2023-2024 व सन 2024-2025 चे सातबाÚयावर पिकपेरा चढविण्याकरीता लोकसेवक यांनी धारण केलेल्या पदाचा दुरूपयोग करून आपला आर्थिक फायदा करून घेण्याकरीता 3,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी करून तक्रारदार यांचेकडुन 3000/- रूपये लाच रक्कम गैरअर्जदार यांचे साजा क्र. 21, मौजा काजळी येथील कार्यालयात स्विकारताना रंगेहाथ पंचासमक्ष मिळुन आल्याने भ्रश्टाचार प्रतिबंधक अधिनियम-1988 चे कलम 7 अंतर्गत गुन्हा केल्याने माझी त्यांचेविरूध्द षासन तर्फे कायदेषीर फिर्याद आहे.

समक्ष

(कान्होपात्रा बन्सा)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MAHESH MADHUKAR BHORTEKAR(I (Inspector)) / POBW04422 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

PI-Barud 19/01/2025

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MAHESH MADHUKAI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBW04422

स्टेशन डायरी अमलदार
पोलीस स्टेशन, कारंजा (घा)
जि. वर्धा